# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पुर्वीचे पुणे विद्यापीठ)

**परिपत्रक क्र. 11 /२०२१**

सर्व कर्मचा-यांना सुचित करण्यात येते की, सन २०२०-२१ साठी आयकराची कर आकारणी करण्यासाठी आयकर विभागाकने दोन पर्याय उपलब्ध करुन दिलेले आहेत. या दोन पर्यायापैंकी एक पर्याय निवडण्याची संधी उपलब्ध आहे. त्यानुसार प्रत्येक सेवकाची दोन वेगवेगळया करप्रणाली मध्ये कर गणना (calculation) करुन ती HR System मध्ये उपलब्ध करुन देण्यात आली आहे. सदर परिगणनेनुसार सेवकांना फायदेशीर व योग्य वाटणारा पर्याय निवडावा , त्यानुसार पुढील दोन महिन्यामध्ये करकपात करण्यात येईल.

पर्यायाची निवड आपली बचत , गृहकर्ज परतावा इ. गोष्टींचा विचार करुन करावी. पुढे असे सुचित करण्यात येते की, एकदा निवडलेला पर्याय पुन्हा बदलता येणार नाही याची नोंद घ्यावी. पर्याय निवडतांना काही अडचणी आल्यास वेतन विभागास संपर्क साधावा.सदर पर्याय निवडण्याची शेवटची तारीख २०.०१.२०२१ असून सेवकांनी सदर पर्यायाची दिलेल्या वेळेत निवड करावी , जेणेकरुन जानेवारी २०२१ चे वेतन वेळेवर अदा करणे सोईचे होईल. जे सेवक पर्यायाची निवड वेळेत करणार नाहीत त्यांची कर आकारणी जुन्या पर्यायाप्रमाणे होईल याची नोंद घ्यावी.

AB Patankar

**(सीए अतुल पाटणकर)**
**वित्त व लेखा अधिकारी**

गणेशखिंड, पुणे – ४११००७
जा.क्र. वित्त/ 1214
दिनांक- ०८/०१/२०२१

**प्रत माहितीसाठी –**

१. मा. विभागप्रमुख , सर्व शैक्षिणक विभाग )
२. मा. शाखाप्रमुख , सर्व प्रशासकिय शाखा )

कृपया सदर परिपत्रक सर्व कर्मचा-यांच्या निदर्शनास आणावे.

D:\MAHESH karankal\MAHESH MARATHI LETTERS.docx